# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

शासकीय तंत्रनिकेतन परिसर,पोस्ट बॉक्स नं-२१९,
सामनगांवरोड,नाशिकरोड,नाशिक-४२२१०१
☎(०२५३)२४६१४७९,२४६०११४, फॅक्स:२४५५३०१
e-mail:ronashik.dte@gmail.com Web site : www.dtensk.org


**संकेत स्थळावरील प्रसिध्दीसाठी.**

जा.क्र तंशि/विकाना/लले/वर्ल्डक्लासपॉ/२०१०/685

दिनांकः- 2 MAY 2011

**प्रति,**
प्राचार्य,
सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित,विनाअनुदानित
तंत्रनिकेतने,नाशिक विभाग

**विषयः-दिनांक १३.११.२००९ रोजी झालेल्या कार्यशाळेमध्ये ठरविल्यानुसार करावयाच्या कार्यवाहीसाठीबाबत.**

**संदर्भः-**१)मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.राज्य,मुंबई यांचे आपणांस उददेशून असलेले व या कार्यालयास अग्रेषित असलेले पत्र क्र.१०/पदविका/तक्रार/२००९/८३०,दि.९.१२.२००९

२) मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.राज्य,मुंबई यांचे या कार्यालयास उददेशून असलेले स्मरणपत्र क्र.१०/एनजीपी२०१०/९०८,दि.३०.१२.२०१०

उपरोक्त विषयास अनुसरुन मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.राज्य,मुंबई यांचे उपरोक्त संदर्भ क्र.१ चे पत्रान्वये **'हाऊ टू मेक वर्ल्डक्लास पॉलीटेक्नीक्स'** या विषयावरील कार्यशाळा दिनांक १३ नोव्हेंबर २००९ रोजी औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आली होती. आपण स्वतः यासाठी उपस्थित होता. कार्यशाळेमध्ये विविध तज्ञांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार कृती आराखडा तयार करण्यात आला असून तो उपरोक्त संदर्भ क्र.१ चे पत्रात नमूद करण्यात आलेला आहे. सोबत सुलभ संदर्भासाठी संचालनालयाचे संदर्भ क्र.१ चे पत्राची छायांकित प्रत जोडली आहे. त्यानुसार प्रत्येक प्राचार्य/संस्था चालकांनी आपल्या तंत्रनिकेतनामध्ये कार्यवाही करावयाची असल्याचे संचालनालयाने निर्देश दिलेले आहेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या विभागीय कार्यालयामार्फत संचालनालयाने मागीतलेला होता. परंतु याबाबतचा आपल्या संस्थेचा अहवाल या विभागीय कार्यालयास पाठविण्यात आलेला नाही. संचालनालयाचे संदर्भ क्र.२ चे स्मरणपत्रानुसार संचालनालयाचे संदर्भ क्र.१ चे पत्रात नमूद बाबींबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास तात्काळ सादर करण्याबाबत या कार्यालयास संचालनालयाचे निर्देश प्राप्त झालेले आहेत.

तरी आपणांस कळविण्यात येते की, संचालनालयाचे सोबत जोडलेले संदर्भ क्र.१ चे पत्रात नमूद बाबींबाबत आपल्या संस्थेने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्याकरीता या कार्यालयास तात्काळ सादर करावा जेणेकरुन याबाबतचा अहवाल या कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करणे या कार्यालयास शक्य होईल.

**( दि.रा.नंदनवार )**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,नाशिक.

प्रत-मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.राज्य,मंबई-४०० ००१ यांना माहितीसाठी सादर.
**प्रत-प्रोग्रामर,तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,नाशिक.**
२/ त्यांना कळविण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर तात्काळ प्रसिध्द करावे.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dte.org.in Website : www.dte.org.in


क्रमांक : १०/पदविका/तक्रार/२००९/ ८३०
दिनांक : ९ डिसेंबर DEC 2009

प्रति,
प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित
व शासकीय तंत्रनिकेतन

**विषय :-** दिनांक १३.११.२००९ रोजी झालेल्या कार्यशाळेमध्ये ठरविल्यानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत.

"हाऊ टू मेक वल्डक्लास पॉलिटेक्निक्स" या विषयावरील कार्यशाळा दिनांक १३ नोव्हेंबर रोजी औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आली होती. आपण स्वतः यासाठी उपस्थित होता. कार्यशाळेमध्ये विविध तज्ज्ञांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार खालीलप्रमाणे कृती आराखडा तयार करण्यांत आला आहे. त्यानुसार प्रत्येक प्राचार्य / संस्था चालकांनी आपल्या तंत्रनिकेतनामध्ये कार्यवाही करावयाची आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित सहसंचालकांमार्फत या संचालनालयास पाठवावयाचा आहे.

## अ) दिनांक ३१ मार्च, २०१० पर्यन्त पूर्ण करावयाची कार्यवाही.

१. पात्र संस्थांनी एनबीए नामांकनासाठी अर्ज करावे.
२. प्रत्येक संस्थेमध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या मानकानुसार पात्र प्राचार्य, शिक्षकेतर व शिक्षकीय कर्मचाऱ्यांची नेमणूक करुन मा.संचालक / सहसंचालकांची मान्यता घ्यावी.
३. संस्थेमधील माजी विद्यार्थ्यांची संघटना तयार करुन त्याची नोंदणी करावी. त्या अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात यावे.
४. सर्व संस्थांमध्ये बायोमेट्रीक मशिन लावण्यात यावी व सर्व शिक्षकीय व शिक्षकेतर कर्मचारी वेळत येतील याबाबत दक्षता घ्यावी.
५. उद्योगधंद्याच्या मदतीने निरंतर प्रशिक्षण योजने अंतर्गत विविध अभ्यासक्रम चालविण्यात यावेत.
६. शासनाकडून "की परफॉरमन्स इंडिकेटर" बाबत शासन निर्णय निर्गमित होईल त्याचे तंतोतंत पालन करावे.
७. संस्थेमध्ये प्लेसमेंट सेल स्थापन करुन त्या अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात यावेत.
८. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकासासाठी प्रत्येक महिन्यात कमीत कमी एक उपक्रम आयोजित करावा.
९. प्रत्येक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना एनआयटीटीआर / सीआयआय / एआयएसटीई / आयएसटीई यांच्यामार्फत होणाऱ्या प्रशिक्षण वर्गाला प्रतिनियुक्त करावे.
१०. प्रत्येक संस्थेमध्ये लँगवेज लॅब तयार करुन विद्यार्थ्यांचे संभाषण कौशल्य वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत.
११. महाराष्ट्र शासनाने जैन, ख्रिश्चन, बौध्द, पारशी, शिख व मुस्लीम व केंद्र शासनाने ख्रिश्चन, बौध्द, पारशी, शिख व मुस्लीम या अल्पसंख्यांक समुदायासाठी शिष्यवृत्ती योजना, तसेच व्यावसायाभिमुख प्रशिक्षण योजना लागू केलेली आहे याबाबतचे शासन निर्णय या संचालनालयाच्या

www.dte.org.in वर उपलब्ध आहेत त्यास संस्थेमध्ये योग्य ती प्रसिध्दी देण्यांत यावी व अल्पसंख्यांक समुदायाचे अर्ज संबंधित विभागीय कार्यालयाकडे पाठविण्यांत यावेत.

## ब) जून २०१० पर्यन्त पूर्ण करावयाचे उपक्रम.

१२. ज्या संस्थांना १५ वर्षे पूर्ण झालेली आहेत, अशा संस्थांनी शैक्षणिक स्वायत्ततेसाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडे अर्ज सादर करावा.
१३. तंत्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी नेटवर्क तयार करावे.
१४. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेमार्फत देण्यात येणाऱ्या विविध योजनांतर्गतच्या अनुदानासाठी अर्ज सादर करुन अनुदान प्राप्त करुन घ्यावे.
१५. संस्थेमध्ये डिजिटल लायब्ररी तयार करावी.
१६. प्रशासकीय कामासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या माहिती संकलित करण्यासाठी एमआयएस तयार करावे.
१७. शिक्षक व विद्यार्थी यांना शोध निबंध, प्रोजेक्ट स्पर्धेमध्ये भाग घेणे तसेच विविध परिषदेमध्ये भाग घेणे यासाठी प्रवृत्त करावे.
१८. संस्थेमार्फत विद्यार्थी व शिक्षकांसाठी परिषदा आयोजित कराव्यात.
१९. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई तसेच स्वायत्त संस्था यांनी अभ्यासक्रमामध्ये उद्योगधंद्याच्या गरजेनुसार फेरबदल करावा. तसेच नवीन विषयांचा समावेश करावा.
२०. शाखांतर्गत विषयांची संख्या (इंटर डिसीप्लीनरी कोर्सेस) अभ्यासक्रमामध्ये वाढविण्यांत यावी.
२१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई तसेच स्वायत्त संस्था यांनी परीक्षा पध्दतीमध्ये बदल करुन आधुनिकता आणावी.
२२. संस्थेमधील भौतिक सुविधा पीपीपी (पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप) मोडद्वारे विकसीत कराव्यात.
२३. जीईआर वाढविण्यासाठी विविध शिष्यवृत्ती योजना संस्थेमध्ये प्रभावीपणे राबविण्यात याव्यात.
२४. शिक्षक व विद्यार्थी यांचे परदेशाबाहेरील संस्थेबरोबर अदलाबदल करण्याचे उपक्रम सुरु करावेत. (एक्सचेंज ऑफ स्टुडंट ॲंड फॅकल्टी)
२५. विविध उपक्रमाद्वारे संस्थेमध्ये अंतर्गत महसूल निर्मिती वाढवावी.
२६. एखादे क्षेत्र निश्चित करुन त्या क्षेत्रामध्ये संस्थेत सेंटर ऑफ एक्सलन्स निर्माण करावे.
२७. संस्थेमध्ये उद्योजकता विकास केंद्र स्थापन करावे.
२८. महाराष्ट्र शासनाने सीआयआय बरोबर सामंजस्य करार केलेला आहे. त्याद्वारे विविध उपक्रम आयोजित करुन या सामंजस्य कराराचा प्रत्येक संस्थेने लाभ घ्यावा.
२९. सर्व विद्यार्थ्यांचा खेळामध्ये सहभाग वाढावा यासाठी संस्थांनी प्रयत्न करावा
३०. उद्योगधंद्याच्या गरजेनुसार प्रत्येक संस्थेने फिनिशिंग स्कूल चालू करुन विद्यार्थ्यांना प्रशिक्षण द्यावे.

सुमहाजन

( डॉ. सु. का. महाजन )
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२. संचालक, तंत्रशिक्षण मंडळ महाराष्ट्र राज्य, बांद्रा (पूर्व) , मंबई-५१
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी. त्यांना कळविण्यांत येते कीं, त्यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व तंत्रनिकेतनांमध्ये वरील उपक्रमांची कार्यवाही करुन घ्यावी.